| MHAH070004632025 | सत्र खटला क्र.१७/२०२५ आदेश नि.१८<br>१. अक्षय बाळासाहेब वावरे वि.महा. सरकार |
|---|---|

१. प्रथमखबर वाचली असता असे निदर्शनास येते की, दि.११.११.२०२४ रोजी फिर्यादी संकेत सुभाष लोळगे हा साकुर येथील त्यांचे कान्हा ज्वेलर्स दुकानात दुपारी १.३० वा.चे सुमारास ठमाजी जोरी नावाचे ग्राहकाला सोन्याचे भाव सांगत असताना अचानक दुकानात पाच अनोळखी इसम आले. त्यांचे तोंड बांधलेले होते व त्यांच्या हातात पांढरे हातमोजे होते. त्यांच्यापैकी तीन जणांकडे गावठी कट्टे (पिस्तुल) होते. त्यांनी गावठी कट्टा फिर्यादी संकेतला दाखवून दम दिला की, "तु खाली बस". गावठी कट्टा दाखविल्याने फिर्यादी संकेत घाबरुन काउंटरच्या खाली बसला. दुकानात आलेल्या ग्राहकास "तु शांत बस" असे म्हणून त्याला खाली बसविले. त्यांच्यापैकी एक जण काउंटरच्या आतमध्ये चांदीचे व सोन्याचे तयार दागिने काढून काउंटरवर ठेवत होता. त्या पाच जणांपैकी तीन इसमांनी त्यांचेसोबत आणलेल्या बॅगमध्ये ते भरले व एक जण दुकानाचे दारावर गावठी कट्टा घेवून उभा होता. त्यानंतर ते सर्व इसम फिर्यादी संकेतच्या दुकानातील सोन्या चांदीचा सुमारे ५२,४१,६००/- रुपये किंमतीचा माल बॅगमध्ये भरुन घेवून दुकानाच्या बाहेर जावून हवेत तीन वेळा गोळीबार करुन दोन मोटार सायकलवर बसून मांडवेच्या दिशेने पळून गेले. या आशयाची प्रथमखबर फिर्यादी संकेत लोळगे यांनी दिली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता कलम ३१०(२), हत्यार अधिनियम ३/२५ अन्वये गुन्हा रजि. क्र.४०२/२०२४ दि.११.११.२०२४ रोजी रात्री ९.२९ वा. घारगाव पोलीस ठाणे येथे नोंद करण्यात आला.

२. गुन्हा रजि. क्र. ४०२/२०२४ चे तपासात असे निदर्शनास आले की, आरोपी क्र.१ ते ९ यांनी पुर्वनियोजित कट रचून बारामती शहरातील दोन

काळया रंगाच्या पल्सर मोटारसायकली चोरुन आणल्या. आरोपी क्र.१, ७ व ८ यांनी आरोपी क्र.९ यास पंजाब येथून बोलावून घेतले. घटनेवेळी फिर्यादीचे दुकानात जे आरोपी तोंडाला कापड बांधून,हातात हातमोजे घालून अग्नीशस्त्र धारण करुन शिरले त्यामध्ये अर्जदार/आरोपी क्र.१ अक्षय वावरे होता. याही पुढे अर्जदार/आरोपी क्र.१ ने दुकानातील काउंटर पलीकडे जावून दुकानाच्या भिंतीला लावण्यात आलेल्या **सोन्याच्या दागिन्याचे ट्रे व काउंटरमधील सोने व चांदीचे तयार दागिने आरोपी क्र.३, ४ व ९ यांना बॅगेत भरण्यासाठी दिले**. अशाप्रकारे **अर्जदार/आरोपी क्र.१ ची गुन्हयातील भुमिका सक्रीय, ठोस व महत्वाची आहे**.

३. तपासांती भारतीय दंड संहिता कलम ६१ (२) व ४९ तसेच शस्त्र अधिनियम कलम ७, २७ ही वाढवून दि.२०.०५.२०२५ रोजी अर्जदार/आरोपी क्र.१ व अन्य ८ आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. अर्जदार/आरोपी क्र.१ अक्षय वावरे याचे जामीन अर्जातील कथन व त्याचे सुविद्य विधीज्ञ श्री. एम.एम.खान यांचा युक्तीवाद आहे की, अर्जदार/आरोपी निष्पाप आहे. त्याचा सदर गुन्हयाशी काहीही संबंध नाही. प्रथमखबर सात तासांच्या विलंबाने दाखल आहे. त्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण नाही. अर्जदार/आरोपीस त्रास देण्यासाठी, त्याची बदनामी करण्यासाठी सदर गुन्हयात खोटे गोवले आहे. अर्जदार/आरोपी शिक्री गावात लपला होता याबाबत कोणतीही विश्वसनीय माहिती नाही. अर्जदार/आरोपीने गुन्हयाची योजना तयार केल्याचे अथवा गुन्हा करण्याच्या उद्देशाबाबत पुरावा नाही. पोलीसांची तपासाची कार्यपद्धती विश्वसनीय आणि समाधानकारक नाही तसेच पोलीसांनी केलेली वसूली देखील संशयास्पद आहे. पोलीसांनी केलेल्या तपासातून अर्जदार/आरोपीचा सदर गुन्हयात सहभाग असल्याची पुष्टी होत नाही. अर्जदार/आरोपीविरुद्ध काही गुन्हे प्रलंबित असल्याने पोलीसांनी केवळ संशयाने त्याला सदर गुन्हयात गोवले आहे. पोलीसांनी कोणत्याही पुष्टीकरणात्मक पुराव्याशिवाय अर्जदार/आरोपीस गुन्हयात

खोटे गोवले. पोलीसांसमोर सह-आरोपींचा कबुली जबाब हा पुराव्याचा कमकुवत भाग आहे आणि तो पुराव्यामध्ये ग्राहय धरला जात नाही. अर्जदार/आरोपीची गुन्हेगारी पार्श्वभुमी नाही. सदर गुन्हयातील आरोपी क्र.२ स्वप्नील किशोर येडे, आरोपी क्र.३ सुनिल उर्फ निल विजय चव्हाण व आरोपी क्र.६ योगेश अंकुश कडाळे यांना जामीनावर सोडले आहे. अशापरिस्थितीत सदर अर्जदार/आरोपीस समान न्याय तत्वाचा लाभ मिळण्याचा हक्क आहे. सदर गुन्हयात नोंदवलेल्या कलमांना मृत्युदंड किंवा जन्मठेपेसारखी शिक्षा नाही. गुन्हयाचा तपास पुर्ण झालेला असल्याने अर्जदार/आरोपीची कोठडीतील चौकशीची आवश्यकता नाही. अर्जदार/आरोपी गेल्या आठ महिन्यांपासून तुरुंगात आहे. अर्जदार/आरोपी २४ वर्षाचा तरुण मुलगा आहे. अर्जदार/आरोपीवर कुटुंबाची जबाबदारी आहे. अर्जदार/आरोपी तुरुंगात राहिल्यास अर्जदार कुटुंबाचे फार मोठे नुकसान होईल. अर्जदार/आरोपीस जामीनावर सोडल्यास प्रत्येक तारखांना हजर राहील. अर्जदार/आरोपी न्यायापासून पळून जाणार नाही आणि तपास यंत्रणेला सहकार्य करेल. अभियोगपक्षाच्या पुराव्यांची छेडछाड करणार नाही. न्यायालयाच्या अटींचे पालन करेल.

५. अर्जदाराचे सुविद्य विधीज्ञ श्री.एम.एम.खान यांचा युक्तीवाद पुढे असा आहे की, दि.१२.११.२०२४ रोजी अन्य आरोपींना जामीनावर मुक्त केले आहे. शिक्री हे ठिकाण साकूरपासून २० कि.मी. अंतरावर आहे. मोटारसायकलचे वर्णन नमुद नाही. अर्जदाराकडून एकही बंदूक जप्त नाही. प्रथमखबर विलंबाने दाखल झाल्यामुळे त्याचे सत्यतेबाबत शंका निर्माण होते.

६. अर्जदार/आरोपीच्या सुविद्य वकीलांनी त्यांच्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ खालील नमुद न्यायनिवाडयांचा आधार घेतलाः–

i) 2020 STPL 2412 SC
Prabhakar Tewari

v/s.

State of Uttar Pradesh and another

*Hon'ble Supreme Court held that, the offence alleged no doubt is grave and serious and there are several criminal cases pending against the accused. These factors by themselves cannot be the basis for refusal of prayer for bail.*

ii) Bail Application No.1120 of 2023
decided on 30.06.2023
Ramakaran Chhotelal Prajapati

v/s.

State of Maharashtra

*Hon'ble Bombay High Court held that, applicant accused alleged to have facilitated the smooth transaction involving looting of gold biscuits and cash. Applicant's role found similar to co-accused who was earlier released on bail. Bail granted.*

iii) Bail Application (BA) No.864 of 2022
decided on 15.09.2022
Sheikjh Sonu Jabbar

v/s.

State of Maharashtra

*Hon'ble Bombay High Court held that, applicant accused not named in FIR. No incriminating evidence against applicant. Memorandum under Section 27 of Indian Evidence Act, 1872 not sufficient to attribute specific role in crime. Identification parade not carried out. Considering period of incarceration, completed investigation, and parity with other accused, bail granted on conditions.*

७. सुविद्य अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए.वाकचौरे यांचे म्हणणे नि.२२ मधील कथन व युक्तीवाद असा आहे की, अर्जदार/आरोपी हा संघटीतपणे गुन्हे करत असून तो गुन्हयातील टोळी प्रमुख आहे. त्याच्याविरुद्ध गंभीर स्वरुपाचे १० गुन्हे दाखल आहेत. अर्जदार/आरोपी व सह आरोपी यांनी गुन्हयाचा कट रचुन फरार आरोपी क्र.८ धोंडया महादु जाधव यांच्या सांगण्यावरुन सह आरोपी क्र.२ व क्र.४ यांना सोबत घेवून बारामती शहरातून दोन मोटार सायकली चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अर्जदार/आरोपी कान्हा ज्वेलर्स साकुर येथे समक्ष हजर असल्याने फिर्यादीने त्याला पाहिले होते. अर्जदार/आरोपी यास फिर्यादीने ओळख परेडमध्ये ओळखले आहे. अर्जदार/आरोपीकडून सोने चांदीचे दागिने व रोख रक्कम हस्तगत करणे बाकी आहे. अर्जदार/आरोपीने गुन्हयात वापरलेले दोन अग्नी शस्त्रापैकी एक अग्नीशस्त्र हस्तगत करणे बाकी आहे. अर्जदार/आरोपी जामीन मिळाल्यास अग्नीशस्त्राची विल्हेवाट लावून तपासात अडथळा निर्माण करेल. अर्जदार/आरोपीविरुद्ध दहा गुन्हे दाखल असलेबाबत पोलीस रिपोर्टमध्ये नमुद आहे. अर्जदार/आरोपीने सराफाच्या दुकानावर सशस्त्र दरोडा टाकल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अर्जदार/आरोपीसोबत एकुण पाच आरोपींव्यतिरिक्त आणखी चार आरोपी साथीदार असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून गुन्हयातील आरोपी क्र.८ धोंडया जाधव फरार आहे. अर्जदार/आरोपीविरुद्ध सकृतदर्शनी पुरावा प्राप्त झाला आहे. आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल झाले आहे.अर्जदार/आरोपी सराईत गुन्हेगार आहे. अर्जदार/आरोपीविरुद्ध मालाविरुद्धचे व शरीराविरुद्धचे गुन्हे दाखल आहेत. अर्जदार/आरोपीने जामीन अर्ज क्र.३०/२०२५ दाखल केलेला अर्ज दि.०६.०३.२०२५ रोजी नामंजूर केला आहे.

८. सुविद्य अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए.वाकचौरे यांचा पुढे युक्तीवाद असा आहे की, अर्जदार/आरोपीस ओळख परेडमध्ये साक्षीदारांनी ओळखले. बारामतीमधील चोरलेली मोटारसायकल अर्जदाराने गुन्हयाकामी वापरली. गुन्हयाचे सुत्रधाराला अटक होणे बाकी आहे. पूर्वीचा जामीन नामंजूर

झाल्यानंतर परिस्थितीमध्ये कोणताही बदल झालेला नाही. अर्जदार/आरोपीविरुद्ध १० गुन्हे दाखल आहेत.

९. विवाद्य कथने, युक्तीवाद व दाखल कागदपत्रे यांचा साकल्याने विचार केला. फिर्यादीचे दुकानातून चोरीस गेलेल्या मालाची किंमत ५२,४१,६००/– इतकी मोठी आहे. भारतीय दंड संहिता ३१०(२) चे गुन्हयास जन्मठेपेची शिक्षा आहे. **सकृतदर्शनी गुन्हा रजि.क्र.४०२/२०२४ मधील अर्जदार/आरोपी क्र.१ ची भुमिका सक्रीय व महत्वाची आहे. त्याचा गुन्हयामध्ये पुढाकार होता असे सकृतदर्शनी निदर्शनास येते**.

१०. अर्जदार/आरोपी क्र.१ विरुद्ध २०१८ ते २०२४ या कालावधीत **११** गुन्हे दाखल असून त्यातील ४ गुन्हे त्याने संघटीत टोळीचे माध्यमातून केले आहेत. **अर्जदार/आरोपी क्र.१ यास फिर्यादीने ओळख परेडच्यावेळी ओळखले आहे**.

११. अर्जदार/आरोपी क्र.१ यास दि.१२.११.२०२४ रोजी अटक करण्यात येवून दि.१८.११.२०२४ पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली होती. त्यानंतर तो न्यायालयीन कोठडीत आहे. अर्जदार/आरोपी क्र.१ चा पहिला जामीन अर्ज दि.०६.०३.२०२५ चे आदेशाने माझे सुविद्य पुर्वाधिकारी यांनी नामंजूर केला होता.

१२. प्रस्तुत गुन्हयातील आरोपी क्र.६ योगेश कडाळेला मी दि.०७.०७.२०२५ रोजी जामीन मंजूर केला होता कारण त्याची गुन्हयातील भुमिका दरोडेखोर आरोपींना आश्रय देणे एवढीच मर्यादीत होती. प्रस्तुत गुन्हयातील आरोपी क्र.२ स्वप्नील येळेला दि.०७.०७.२०२५ रोजी जामीन मंजूर केला होता कारण त्याची गुन्हयातील भुमिका हवेत गोळीबार केला एवढीच मर्यादीत होती व त्याच्याविरुद्ध पूर्वीचे दोनच गुन्हे दाखल होते. अर्जदार/आरोपी क्र.१ ची गुन्हयातील भुमिका उपरोक्त दोन आरोपींच्या भुमिकेपेक्षा जास्त सक्रीय व गंभीर स्वरुपाची असून अर्जदार/आरोपी क्र.१ विरुद्ध यापूर्वी विविध पोलीस

ठाण्यामध्ये १० गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. या पार्श्वभुमीवर अर्जदार/आरोपी क्र.१ समान न्यायतत्वाने जामीनास पात्र ठरत नाही.

१३. गुन्हयाचे स्वरुप, गुन्हयात दरोडा टाकून चोरी केलेल्या मालाची किंमत, मालाचे स्वरुप, गुन्हयाची कार्यपद्धती, गुन्हयातील अर्जदार/आरोपी क्र.१ चा सहभाग व भुमिका, गुन्हयास असलेली जन्मठेपेची शिक्षा व अर्जदार/आरोपी क्र.१ विरुद्ध यापूर्वी दाखल असलेल्या गुन्हयांची संख्या यासर्व बाबी साकल्याने विचारात घेता तो जामीनास पात्र नाही. अर्जदार/आरोपी क्र.१ याला जामीनावर मुक्त केले तर तो परागंदा होण्याची, आणखी गुन्हे करण्याची, गुन्हा रजि.क्र.४०२/२०२४ मधील पुराव्यात हस्तक्षेप, छेडछाड करण्याची, साक्षीदारांना दबाव, दडपण, धाक, अमीष याद्वारे प्रभावित करण्याची शक्यता विचारात घेता त्यास जामीन मंजूर करणे न्यायोचित ठरणार नाही. भारतीय राज्य घटनेचे अनुच्छेद क्र.२१ अन्वये अर्जदार आरोपीला बहाल केलेल्या वैयक्तिक स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक सुरक्षितता, शांतता, कायदा व सुव्यवस्था अधिक मोलाची आहे. सबब अर्जदार/आरोपी क्र.१ हा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८३ च्या तरतुदीनुसार जामीनास पात्र नाही.

१४. उपरोक्त परिच्छेद क्र. ९ ते १३ मधील कारणमिमांसेमुळे उपरोक्त परिच्छेद क्र.६ मधील नमुद न्यायनिवाडयांतील न्यायतत्वं प्रस्तुत प्रकरणी लागू होत नाहीत.

## <u>आदेश</u>

नियमित जामीन अर्ज नि.क्र.१८ अमान्य केला आहे.

MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Digitally signed by MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Date: 2025.08.12 17:38:46 +0530

संगमनेर ( मंदार नेरलेकर )

दिनांक –१२/०८/२०२५ अतिरिक्त सत्र न्यायाधीश,संगमनेर.